# मालवण-देऊळवाडा घराणे

मालवण हे शहर सिंधुदुर्ग जिल्ह्यात (पूर्वीच्या रत्नागिरी जिल्ह्यात) तालुक्याच्या ठिकाणी असून जवळच समुद्रात इतिहास प्रसिद्ध सिंधुदुर्ग किल्ला असल्यामुळे प्रसिध्द आहे. या ठिकाणी मुंबई आणि रत्नागिरी येथून थेट एस्. टी. बसगाड्यांची सोय आहे. पूर्वीचा आगबोटीचा मार्ग सध्या बंद आहे. मालवण येथे देऊळवाडा या भागात शिवकालापूर्वीपासून अभ्यंकर कुटुंबांची वस्ती होती असे दिसते; कारण श्री. ब. मो. पुरंदरेकृत शिवचरित्रात सिंधुदुर्ग किल्ल्याच्या पायाभरणी समारंभासाठी तेथील जानंभट व दादंभट यांना बोलविले असता त्यांनी मुसलमानांच्या भीतीमुळे शिवाजी महाराजांना नकार दिला होता परंतु त्याबद्दल महाराजांनी अभय आणि संरक्षण दिल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पायाभरणी समारंभाचे पौरोहित्य केल्याचा उल्लेख आला आहे. तथापि तेथील अभ्यंकर कुटुंबीय कुठून इथे वस्तीस आले त्यासंबंधीचा निश्चित पुरावा सापडला नाही. परंतु ते गुहागर किंवा कुर्धे इ. उत्तरेकडून खाली मालवण येथे आले असावेत असे म्हणतात. सध्या मालवण देऊळवाडा येथे अभ्यंकरांची सहा घरें असून त्यांत अभ्यंकर कुटुंबीय वस्ती करून आहेत. मालवण येथील श्री. कृष्ण गोपाळ अभ्यंकर यांचेकडून माहिती मिळाली त्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवाजीचे देऊळ बांधलेले आहे. त्याची दररोज पूजा करणे व नैवेद्य दाखविणे इ.चे अधिकार त्यांचेकडे आहेत. त्याकरता पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानाकडून देणगी रू.१००/- मेहनताना म्हणून मिळत होती व ती अद्यापही चालू आहे. देऊळवाडा येथील श्री नारायण, रामेश्वर, आणि सातेरी देवी यांच्या पालखीस खांदे देण्यासाठीचा अधिकार त्यांचे घराण्याकडे आहे. त्यानुसार द्यावयाचे रू.८०/- प्रतिवर्षाप्रमाणे ते देत आहेत. मालवण येथील धुरीवाडा ते वायरी पर्यंत (नगरपालिकेच्या हद्दीत) भिक्षुकी करण्याचा अधिकार पूर्वीपासून त्यांचे घराण्याकडे चालत आलेला आहे. त्या हद्दीबाहेर भिक्षुकी करण्याचा अधिकार त्यांचे चुलत बंधू श्री. केशव विष्णु अभ्यंकर यांचे घराण्याकडे होते. हे सर्व अधिकार शिवाजी महाराजांनी दिलेल्या ताम्रपटानुसार होते. परंतु १९२८ साली खेर मंत्रीमंडळ आल्यानंतर माननीय लठ्ठेसाहेब यांच्या कमिशनने अभ्यंकरांकडील हे अधिकार रद्द केले व लोकांनी त्यांचे इच्छेनुसार कोणाही ब्राह्मणास आपल्या घरी याज्ञिकी करण्यासाठी बोलवावे असा निकाल दिला. शिवाजीची पूजा आणि देवांची पालखी याकरिता अभ्यंकर घराण्यास बरीच जमीन (शेती व वरकस) दिलेली होती. त्यापैकी आता अगदी थोडीच जमीन त्यांचे घराण्याकडे अजूनही आहे. सोयीसाठी मालवण येथील दोन घराणी दाखविली आहेत. १)जानंभट्ट घराणे २) कृष्णंभट घराणे.

## मालवण देऊळवाडा घराणे क्र.१

### वंशावळी क्रमांक १

### मालवण-रत्नागिरी-मुंबई

१/१ **जानंभट**-यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याच्या पायाभरणी समारंभास बोलाविले असता आदिलशहाच्या भीतीपोटी नकार दिला होता. पण त्यांना महाराजांनी अभय दिल्यावर दादंभटांबरोबर सिंधुदुर्ग किल्ल्याच्या पायाभरणी समारंभाचे पौरोहित्य केले. (पहा-श्री. ब. मो. पुरंदरे लिखित शिवचरित्र पान ४२४/२५) इतर विशेष माहिती नाही. पण मालवण येथे भिक्षुकीचा व्यवसाय आणि अधिकार होता.

२/२ **कृष्णंभट जानंभट**- #


३/३ **अनंत कृष्णंभट**- #

४/४ **धोंडभट अनंत**-हा कृष्णभट अनंत भट (२री वंशावळी) यांचा भाऊ असावा.

५/५ **हरि धोंडभट**- #

६/५ **कृष्णंभट धोंडभट**- #

## मालवण-देऊळवाडा घराणे क्रमांक १
## वंशावळी क्रमांक १
## मालवण–रत्नागिरी–मुंबई




७/६ **विनायक कृष्णंभट– #**
भार्या : **गोपिकाबाई–**पुत्रसंतान नव्हते म्हणून विठ्ठलचा तृतिय पुत्र लक्ष्मण यास दत्तक घेतला.
८/७ **लक्ष्मण विनायक (द.आ.) – #**
९/६ **विठ्ठल कृष्णंभट–**वास्तव्य–मालवण, देऊळवाडा.
भार्या : **सत्यभामा–**माहेर–लेले, चिंदर.
कन्या :
१) **चिमाबाई–**सासर–चिमाबाई दामोदर लेले, चिंदर.
१०/७ **श्रीधर विठ्ठल–**व्यवसाय–भिक्षुकी.
वास्तव्य–मालवण, देऊळवाडा जि. सिंधुदुर्ग.

भार्या : **उमाबाई**—माहेर—उमाबाई वझे.
कन्या :
१) **ताराबाई**—सासर—रमाबाई सदाशिव खाडिलकर. जन्म १९०३ हयात.
२) **काशीबाई**—सासर—रमाबाई नामदेव खाडिलकर. जन्म १९१७.
३) **नावडीबाई**—सासर—सत्यभामा वामन खाडिलकर. जन्म १९१५.
४) **योगुबाई**—सासर—सावित्री महादेव कुंटे. मृत्यू २८ ।२ ।१९५७.
११/८ **विठ्ठल श्रीधर**—जन्म १८९६. मृत्यू ८ ।६ ।१९५७. शिक्षण—नॉनमॅट्रिक. व्यवसाय—कोर्टात लेखनिक होते. वास्तव्य—देऊळवाडा, मालवण.
भार्या : **सत्यभामाबाई**—माहेर—गोदावरी पांडुरंग चिपळूणकर. कांदळगाव, ता. मालवण.
कन्या :
१) **इंदू**—सासर—विजया दत्तात्रय गोडबोले. मिरज. जन्म २७ ।१ ।१९३२. शिक्षण—१० वी अपनाबाझार—दादर मुंबई—१४ येथे नोकरी.
१२/९ **सीताराम विठ्ठल**—जन्म २७ ।३ ।१९३४ मालवण येथे. शिक्षण—बी. ए. व्यवसाय—पोष्ट खात्यात नोकरी. सध्या सांताक्रूज (पूर्व) मुंबई येथे पोस्टमास्तर. संस्कृत व इंग्रजीचे उत्तम ज्ञान. वास्तव्य—औरंगाबाद येथे स्थायिक.
भार्या : **कमल**—माहेर—कमल अनंत भावे. मुरूड, दापोली, जि. रत्नागिरी.
कन्या : **प्राची**—वय १७ वर्षे. फार्मसीचे शिक्षण चालू.
१३/९ **महेश्वर विठ्ठल**—जन्म १६ ।१२ ।१९३५. शिक्षण—बी. ए. बी. एड. व्यवसाय—१९६८ पासून डॉ. श्री. सी. कुडाळकर हायस्कूल मालवण येथे शिक्षक, तत्पूर्वी मुंबईत पश्चिम रेल्वेत काही काळ नोकरी. बागकाम, धार्मिक ग्रंथपारायणाची आवड.
वास्तव्य—३०१६, देऊळवाडा, मालवण, सिंधुदुर्ग.
भार्या : **मालती**—माहेर—मालती दत्तात्रय दीक्षित, आचरे पाखाडी. पोष्टात नोकरी.
१४/१० **योगेश महेश्वर**—जन्म ८ ।२ ।१९७३. इ.११ वीत शिकत आहे.
१५/९ **श्रीधर विठ्ठल**—जन्म ३० ।६ ।१९३९. शिक्षण—एम्. ए. व्यवसाय—महाराष्ट्र बँकेत मॅनेजर या हुद्द्यावर नोकरी. चित्रकलेची व गणिताची आवड. वास्तव्य—४ ऋणानुबंध सोसायटी, नवीन ठक्कर रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई—५७.
भार्या : **मीना**—माहेर—मीना यशवंतराव गानू (परतूर).
कन्या :
१) **मेधा**—जन्म १९७१. बी. एस्. सी. शिकत आहे.
२) **शुभदा**—जन्म १९७९. ६ वी च्या वर्गात शिकत आहे.
१६/७ **गणेश विठ्ठल**—माहिती मिळू शकली नाही.
भार्या : **सरस्वती**—
१७/७ **लक्ष्मण विठ्ठल (द.गे.)** —हा गोपिकाबाईनी दत्तक घेतला.
भार्या : **यमुनाबाई**—
१८/६ **बाळाजी कृष्णंभट**— #
१९/७ **महादेव बाळाजी**—जन्म १८८८. मृत्यू १९५३ मालवण.
कन्या :
१) **बानूताई**—सासर—बानूताई वझे. पति—जी. के. वझे, बुकसेलर-मेनरोड, नाशिक.
२) **बयाबाई**—सासर—राजवाडे. हयात.
२०/७ **गोपाळ बाळाजी**—जन्म १८९०. मृत्यू १९४३. व्यवसाय—भिक्षुकी, मालवण, देऊळवाडा येथे.
कन्या :
१) **गंगूबाई**—सासर—वझे. मृत्यू १९५०.
२) **वारणाबाई**—जन्म १८८५. मृत्यू १९४५. सासर—करंदीकर.
२१/८ **कृष्ण गोपाळ**—जन्म ४ ।७ ।१९२२. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—महाराष्ट्र शासनात—१ ।१२ ।१९४४ ते ४ ।३ ।१९५६ नोकरी. नंतर केंद्र शासनात नोकरी, ५ ।३ ।११९५६ ते ३१ ।७ ।१९८० पर्यंत. निवृत्ती नंतर युनिसेफ पुरस्कृत अशासकीय सेवेत होते. वास्तव्य—२७४१ वरची आळी, भिडे यांचे घर, रत्नागिरी.
भार्या : **सुधा**—माहेर—सुमति हरि पाटणकर.


कन्या : **मनीषा**–जन्म १ ।४ ।१९६१. सासर–अनुराधा उमेश केळकर, रत्नागिरी. पति–डॉ. उमेश लक्ष्मण केळकर, रत्नागिरी.
२२/९ **प्रमोद कृष्ण**–जन्म ३१ ।७ ।१९५३. शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–अलाहाबाद बँकेत नोकरी. वास्तव्य–ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे.
भार्या : **धनश्री**–माहेर–धनश्री केशव दाते.
पुत्र–**हृषिकेश**– ५ वर्षे.
२३/९ **मिलिंद कृष्ण**–जन्म ४ ।७ ।१९५६. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–दि ठाणे पीपल्स को. ऑप. बँकेत नोकरी. वास्तव्य–ब्राह्मण सोसायटी, नौपाडा ठाणे.
भार्या : **देवश्री**–माहेर–पुरुषोत्तम वा. केळकर यांची कन्या.
कन्या : **पूर्वा**–वय २ वर्षे.
२४/८ **केशव गोपाळ**– #
२५/८ **अनंत गोपाळ**–जन्म १९१९. परागंदा.

## मालवण-देऊळवाडा घराणे क्र. १.

### वंशावळी क्र.२

### मालवण–मुंबई


१/१ **कृष्ण**–व्यवसाय–शेती, भिक्षुकी. वास्तव्य–मालवण-देऊळवाडा.
२/२ **अनंत कृष्ण**–व्यवसाय–शेती, भिक्षुकी. वास्तव्य–मालवण-देऊळवाडा
३/३ **कृष्ण अनंत**–व्यवसाय–शेती, भिक्षुकी. वास्तव्य–मालवण-देऊळवाडा.
४/४ **रघुनाथ कृष्ण**–व्यवसाय–शेती, भिक्षुकी. वास्तव्य–मालवण-देऊळवाडा.
५/५ **दिवाकर रघुनाथ**–वास्तव्य–मालवण-देऊळवाडा.
६/६ **नारायण दिवाकर**–व्यवसाय–शेती, भिक्षुकी. वास्तव्य–मालवण-देऊळवाडा.
कन्या :
१) **मनुबाई**–
२) **येसूबाई**–
३) **आवडी**–
७/७ **दिवाकर नारायण**–व्यवसाय–संगीत क्लास, भिक्षुकी. वास्तव्य–मालवण-देऊळवाडा.
भार्या : **जानकी**–माहेर–आवडी, शहापूर (बेळगाव).
कन्या : **सिंधु**–
८/८ **आनंद दिवाकर**–वास्तव्य–सावंतवाडी. अविवाहित.
९/७ **बापू नारायण**–व्यवसाय–तेलगिरणी व्यवस्थापन. वास्तव्य–कोचीन.
१०/७ **विनायक नारायण**–व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–मुंबई.



**कै. श्री. विष्णु दिवाकर, कै. सौ. आनंदी विष्णु, (मागे उभ्या) कै. सौ. कमल दिनकर रानडे**

११/६ **गोविंद दिवाकर (द. गे.)** –दत्तक गेला.
१२/६ **विष्णु दिवाकर**–मृत्यू ९ ।३ ।१९४५. फाल्गुन वद्य दशमी शके १८६७.
भार्या : **आनंदी**–माहेर–गोदावरी सखाराम जोशी. चेंदवण ता. कुडाळ. मृत्यू २० ।१ ।१९७४.
कन्या :
१) **काशी**–अविवाहित (मृत).
२) **शांता**–सासर–कमल दिनकर रानडे (मृत) रा. तारापूर, जिल्हा. ठाणे
१३/७ **परशुराम विष्णु**–जन्म १२ ।१ ।१९१७. मृत्यू ५ ।९ ।१९८५. मिती. भाद्रपद शुद्ध १ शके १९०७.

# मालवण-देऊळवाडा घराणे क्रमांक १
## वंशावळी क्रमांक २
## मालवण-मुंबई




शिक्षण—मॅट्रिक व डाईंग ब्लीचींगचा कोर्स पूर्ण. व्यवसाय—टेक्सटाईल मिलमध्ये डाईंग मास्तर म्हणून नोकरी. वास्तव्य—५६ चंद्रमा श्रीकृष्णनगर, बोरिवली(पूर्व) मुंबई—६६

भार्या : **प्रमिला**—माहेर—लीला गोविंद देसाई, जैतापूर.


कन्या :

१) **नीला**—जन्म ५ ।६ ।१९४०. सासर—शामला शशिकांत घैसास. वास्तव्य—गणेशप्रसाद, सुदर्शन कॉलनी, ठाणे (पूर्व). व्यवसाय—मुंबई महानगरपालिका शाळेत घाटकोपर येथे शिक्षिका.

२) **अलका**—जन्म १२ ।६ ।१९४३. सासर—वृंदा हेमंत वैद्य. वास्तव्य—'उमाशंकर', कन्याशाळेजवळ,

नारायणपेठ, पुणे—३० हल्ली ७२ स्मृति, श्रीकृष्णनगर, बोरिवली (पूर्व), मुंबई—६६.
१४/८ **शरद परशुराम**—जन्म९ ।१२ ।१९३९.
शिक्षण—आर्किटेक्ट. वास्तव्य—१२६५४ स्टील पाँड लेन, हर्न डॉन यु. ऐ. २२०७१ (७०३) ६२०-५१०६, अमेरिका.
भार्या : **संगिता**—शिक्षण—एम्. एस्. माहेर—रमोला रानडे, कोल्हापूर.
कन्या : **सबरीना**—जन्म १९८०. शाळेत शिकत आहेत.
पुत्र—**समीर**—जन्म १९८२.
१५/८ **प्रमोद परशुराम**—जन्म २३ ।६ ।१९५४.
शिक्षण—इयत्ता ११ वी पास. व्यवसाय—बिल्डरचा. वास्तव्य—५६"चंद्रमा" श्रीकृष्णनगर, बोरिवली (पूर्व) मुंबई—६६.
भार्या : **प्रिया**—शिक्षण—एम्. ए. माहेर—उषा जोशी—पाटील, तारापूर, चिंचणी. व्यवसाय—शिक्षिका.
कन्या : **शिवांगी**—जन्म २३ ।११ ।१९८८.
१६/८ **महेश परशुराम**—जन्म १ ।८ ।१९६२.
शिक्षण—१२ वी पास. व्यवसाय—केमिकल कंपनीत नोकरी. वास्तव्य—"आनंद" स्टेट बँक क्वार्टर्स, जालना रोड, औरंगाबाद. अविवाहित.
१७/७ **वामन विष्णु**—मृत्यू ३१ ।१२ ।१९८३. मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा शके १९०४. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—ज्योतिष. वास्तव्य—महाराष्ट्रात व इतर भागात देवदर्शनार्थ फिरती. निधनसमयी गाणगापुर येथे होते. अविवाहित होते. पुरातन ग्रंथांच्या आधारे श्री. योगेश्वरी सहस्त्रनाम हे पुस्तक छापून विनामूल्य वितरण केले.
१८/७ **विश्वनाथ विष्णु**—जन्म १९०९. मृत्यू २५ ।२ ।१९८९, (माघ वद्य पंचमी. शके १९१०).
शिक्षण—मराठी ६ वी. व्यवसाय—शेती, भिक्षुकी. वास्तव्य—मालवण-देऊळवाडा.
भार्या : **शोभा**—माहेर—दुर्गा, सावंतवाडी.
कन्या : **छाया**—जन्म १४ ।१० ।१९६१.
१९/८ **सुरेश विश्वनाथ**—जन्म १९ ।८ ।१९५०.
शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—भिक्षुकी. वास्तव्य—मालवण-देऊळवाडा.
भार्या : **वृंदा**—माहेर—सुरेखा.
पुत्र—**मंदार**—जन्म १९८८.
२०/८ **शशांक विश्वनाथ**—जन्म ६ ।४ ।१९५४.
शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—पी. डब्ल्यू. डी. त ड्रायव्हर. वास्तव्य—मालवण.
भार्या : **उज्ज्वला**—माहेर—माहित नाही.
कन्या :
१) **सोनाली**— #
२) **दिपाली**— #
२१/८ **गजानन विश्वनाथ**—जन्म ५ ।२ ।१९५७.
शिक्षण—बी. कॉम. नोकरी—जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग मध्ये कारकूनाची नोकरी.वास्तव्य—कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
२२/८ **सुधीर विश्वनाथ**—जन्म १० ।७ ।१९५९.
शिक्षण—८ वी पास. व्यवसाय—खाजगी कँटिन. वास्तव्य—पुणे परिसर.
२३/७ **यशवंत विष्णु**—जन्म माहित नाही. मृत्यू २४ ।८ ।१९६०, (मिती श्रावण वद्य चतुर्थी शके १८८२.) शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—ग्रामसेवक. वास्तव्य—सागवे, तालुका-राजापूर. अविवाहित.
२४/७ **केशव विष्णु**—जन्म १६ ।९ ।१९२७. मालवण येथे. हयात आहेत. शिक्षण—पी. एस्. सी. व्यवसाय—प्राथमिक शिक्षक. सध्या सेवानिवृत्त.
भार्या : **लतिका**—माहेर—दुर्गा. रा. वायंगणी, ता.मालवण.
कन्या :
१) **प्रतिभा**—जन्म १२ ।२ ।१९५७. शिक्षण—बी. कॉम. सासर—प्रज्ञा विश्वनाथ गोडबोले. मु. पो. धनकवडी, पुणे.
२) **सुलभा**—जन्म ६ ।६ ।१९६३. शिक्षण—बी. ए. सासर—ज्योती पुरुषोत्तम वर्तक. रा. सहकारनगर नं.१, पुणे.
२५/८ **प्रदीप केशव**—जन्म ५ ।२ ।१९६१. शिक्षण—बी. ए. व्यवसाय—एल. आय. सी. त डेव्हलपमेंट ऑफिसर. वास्तव्य—आजरा, जिल्हा—कोल्हापूर.
२६/६ **कृष्णा दिवाकर**—व्यवसाय—भिक्षुकी, शेती. वास्तव्य—मालवण-देऊळवाडा. अविवाहित आहेत.

**मालवण घराणे क्रमांक २**
**मालवण-रेडी-शिरोडा-कट्टा-टिटवाळा-ठाणे**




## मालवण घराणे क्रमांक २

### मालवण-रेडी-शिरोडा-कट्टा-टिटवाळा-ठाणे.

श्री. नारायणभट्ट अभ्यंकर हे या घराण्याचे मूळपुरुष, मालवणहून १८२५ ते १८३० चे सुमारास रेडी (ता. वेंगुर्ले) जि. सिंधुदुर्ग, या गांवी आले. रेडीच्या कनयाळेवाडी येथील कामत घराण्याचे कुलदैवत श्रीरामपुरूष यांचे पूजेसाठी म्हणून मालवणहून त्यांनी याना आणले असे म्हणतात. तथापि त्याबद्दल निश्चित पुरावा उपलब्ध नाही. उदरनिर्वाहासाठी कांही बागायती जमीन निरंतर कराराने त्यांना दिली म्हणून रेडी येथील कनयाळे या वाडीत राहिले. सबंध गावाचे पौरोहित्यपण त्यांना मिळाले. बागायती जमीन, नारळ, पोफळी, फणस, काजू, आंबे, इ. ची लागवड असलेली जमीन खंडाने घेऊन घर बांधून राहिले. त्यांना ४ मुलगे होते. १) गणेश

ऊर्फ दादाभट्ट २) रामकृष्ण ऊर्फ आप्पा ३) त्र्यंबक ऊर्फ तात्याभट्ट ४) शिवराम ऊर्फ भाऊभट्ट. चौघेही संस्कृत अध्ययन, पूजापाठ, नित्यकर्म, ज्योतिष, कीर्तन, इत्यादिं विषयांत पारंगत होते. स्वकष्टाने त्यांनी सोयीसाठी रेडी गावांतील श्रीमाऊली देवीचे देवळाजवळ स्वतःचे घर बांधले. कातळ जमिनीत खोल विहीर खणून पाण्याची सोय केली व उपजीविकेसाठी २५ नारळांची झाडे(माड) असलेली जमीन खंडाने संपादित केली. तेथील व्यवस्था प्रथम गणेश ऊर्फ दादाभट्ट हे पहात असत, त्यांचे पश्चात् त्र्यंबकतात्यांचा मुलगा श्रीधर पाही व नंतर त्यांचे निधनानंतर रामकृष्ण ऊर्फ आप्पा पहात असत.

शिवरामभाऊ यांचा मुलगा दत्तात्रय ह्यानी रेडीपासून ४ मैलांवर असणाऱ्या शिरोडा या गांवी व्यवसायानिमित्त वास्तव्य केले. भिक्षुकी व्यवसायांत योग्य मान मिळेना, म्हणून हॉटेल, किराणा दुकान इ. स्वतंत्र व्यवसाय सुरू केले. पुढे १९३५ साली जमीन विकत घेऊन १९३९ साली शिरोडा येथे स्वतःचे दुमजली घर बांधले व मागीलबाजूस२५--३० नारळाची झाडे असलेली जमीन निरंतर कराराने संपादित केली.

आजही रेडी व शिरोडा या ठिकाणी या नारायणभट्ट अभ्यंकरांच्या घराण्यातील वंशजांचे वास्तव्य आहे.

**कुळधर्म कुळाचार**–या घराण्यातील सर्वजण मालवणचे श्रीदेव नारायण, रामेश्वर व सातेरी देवी यांना मानतात व नैवेद्य दाखवितात. नवरात्र असते. तसेंच गणपतिची पूजा करण्याची प्रथा आहे व कुलदेवता म्हणून कोल्हापूरची महालक्ष्मी देवी मानतात.

१/१ **नारायण भट्ट**–मृत्यू सन १८८२.
वास्तव्य–मालवणहून रेडी कनयाळेवाडी येथे आगमन व वास्तव्य. परंतु मालवण येथील वंशावळींत यांचा शोध लागला नाही किंवा त्यांचे विषयी अधिक काहीच माहिती मिळाली नाही. यांना ४ पुत्र होते. इतर माहिती उपलब्ध नाही.

२/२ **गणेश नारायण**–जन्म १८५२, मृत्यू १९२९ उत्तम ज्योतिषी होते. वेदाध्ययन झाले होते.

३/३ **गोपाळ गणेश**–जन्म १८९७. मृत्यू २३ ऑगस्ट १९४३. व्यवसाय–भिक्षुकी व ज्योतिषी. रेडी सुकळभाटवाडी येथील माऊलीचे देवळाजवळील दुसऱ्या घरी वास्तव्य होते.
भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर–कावेरी पुराणीक, वेंगुर्ले.

४/४ **रघुनाथ गोपाळ**–जन्म ८ नोव्हेंबर १९२८. शिक्षण–व्ह.फा. व्यवसाय–शिक्षक. नोव्हेंबर १९८६ मध्ये निवृत्त. वास्तव्य–कट्टा, ता. मालवण, येथे स्वतःचे घर बांधून स्थायिक झाले आहेत.
भार्या : **शुभांगी**–माहेर–लीला गणेश रानडे, रा. मोगरणी. ता. मालवण. जि. सिंधुदुर्ग.
कन्या :
१) **ललिता**–जन्म १३ ।१ ।१९६७. शिकत आहे.
२) **अलका**–जन्म ३ ।९ ।१९६९. शिकत आहे.


५/५ **सुनिल रघुनाथ**–जन्म ९ ।१० ।१९६०. शिक्षण–१२ वी पास.
भार्या : **श्रद्धा**–माहेर–पंचगंगा आत्माराम सिद्धये. रा. वझरे दोडामार्गजवळ ता. बांदा.

६/५ **शशिशेखर (अनिल) रघुनाथ**–जन्म ११ ।१ ।१९६२. व्यवसाय–महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळांत मालवण येथे कारकुनाची नोकरी.
भार्या : **कुमुद**–माहेर–कुमुदिनी श्रीकृष्ण जोशी. रा. वेंगुर्ले, भटवाडी, जि. सिंधुदुर्ग.

७/४ **गणेश गोपाळ**–जन्म ५ ।६ ।१९३१. कर्करोगाने मृत्यू २४ ।८ ।१९८८. सन १९८७ मध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून निवृत्त. वास्तव्य–नाडकर्णी चाळ, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
भार्या : **सुषमा**–माहेर-शालिनी वैजनाथ वझे. रा. मसुरे, ता. मालवण. प्राथमिक शिक्षिका, अपत्य नाही.

८/४ **प्रभाकर गोपाळ**–जन्म २३ ।८ ।१९४०. शिक्षण–एम्.ए. व्यवसाय–केंद्र सरकारच्या जनगणना खात्यात (सेन्सस डिपार्टमेंट) मुंबई येथे नोकरी. वास्तव्य–मांडा, टिटवाळा, ता. कल्याण, जि. ठाणे.
भार्या : **सुमंगला**–माहेर–वत्सला कृष्णाजी बेहेरे, पनवेल, जि. रायगड.
कन्या :
१) **वैशाली**–जन्म ११ ।७ ।१९७२. इयत्ता ११ वीत

शिकत आहे.
२) **प्रीती**–जन्म १३ ।१ ।१९७४, ९ वीत शिकत आहे.
९/३ **वासुदेव गणेश**–जन्म १९००, मृत्यू १९६०. व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–रेडी. ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग.
भार्या : **राधा**–माहेर–द्वारका बर्वे. वास्तव्य–अणुसुरे, ता. वेंगुर्ले. जि. सिंधुदुर्ग.
कन्या :
१) **पुष्पा**–जन्म १९४६. शिक्षण–१० वी पर्यंत. सासर–हेमश्री श्रीकृष्ण मराठे. रा. सावंतवाडी. मृत्यू २५ ।४ ।९०.
२) **केशर**–जन्म १९४८. शिक्षण–इ. ७ वी पर्यंत. सासर–शैलजा दत्तगुरू वझे. वास्तव्य–तळवणे, ता. सावंतवाडी. मृत्यू २४ ।४ ।८९.
१०/४ **अनंत वासुदेव**–जन्म १९३५. शिक्षण–मराठी ५ वी. व्यवसाय–भिक्षुकी व बागायती.
वास्तव्य–सुकळभाटवाडी, रेडी, ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग.
भार्या : **विजया**–माहेर–इंदू शंकर सिद्धये, तळकट, ता. सावंतवाडी. जि. सिंधुदुर्ग.
११/५ **प्रसाद (वासुदेव) अनंत**–जन्म ९ ।२ ।१९७४, शिकत आहे.
१२/५ **प्रविण(नारायण) अनंत**--जन्म२२ ।४ ।१९८०.
१३/३**पांडुरंग गणेश**–जन्म १९१०. मृत्यू १९७८. व्यवसाय–भिक्षुकी व कीर्तन.
भार्या : **इंदिरा**–माहेर–चिमा रामचंद्र तुळपुळे. रा. रापझोळंबे. ता. सावंतवाडी.
१४/४ **चंद्रकांत पांडुरंग**–जन्म १३ ।६ ।१९४८. व्यवसाय–भिक्षुकी.
भार्या : **लता**–जन्म १९६१. मृत्यू १९८७. माहेर–पद्मा भट्ट, रा. बावर, ता. कासारगोड. अपत्य नाही.
१५/२ **रामकृष्ण नारायण**–जन्म १८५४. मृत्यू १९३४. करारी व ज्योतिषी म्हणून नावलौकिक.
वास्तव्य–कनयाळे, रेडी. ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग.
कन्या :
१) **गंगा**–सासर–रुक्मिणीबाई रघुनाथ गणपुले. रा. सावंतवाडी. मृत्यू–१९५८.
२) **मनीताई**–सासर–मनुताई दत्तात्रय आपटे. रा. आसोलीपाल. ता. वेंगुर्ले.
१६/३ **दिनकर रामकृष्ण**–जन्म १८९७, मृत्यू २३ ।४ ।१९८०. व्यवसाय–भिक्षुकी व बागायती. वास्तव्य–कनयाळे, रेडी. ता. वेंगुर्ले.
भार्या : **जानकी**–हेर–येसू आपटे. रा. मळेवाड, ता. सावंतवाडी. अपत्य नाही.
१७/३ **वामन रामकृष्ण**–जन्म १९०१. मृत्यू १९७६. व्यवसाय–बागायती व भिक्षुकी. वास्तव्य–कनयाळे, रेडी.
भार्या : **सरस्वती**–माहेर–बनी गणपुले. रा. कोरगांव (गोवा).
कन्या : **अंजनी**–जन्म १९५२ सासर–जयश्री महेश्वर (विजय), पराष्टेकर, सावंतवाडी. सध्या
वास्तव्य–कनयाळे, रेडी, ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग.
१८/२ **त्रिंबक नारायण**–मृत्यू १९२५.
व्यवसाय–भिक्षुकी. वास्तव्य–रेडी, कनयाळेवाडी.
भार्या : नांव माहित नाही.
कन्या : **यमुना**–सासर–राधाबाई वासुदेव खरे, मालवण.
१९/३ **श्रीधर त्रिंबक**–जन्म १९१०. मृत्यू ३० ।४ ।१९४०. वास्तव्य–कनयाळेवाडी, रेडी.
भार्या : **गंगा**–माहेर–मनू विश्वनाथ मराठे, वेंगुर्ले.
कन्या :
१) **कमल**–जन्म १९३४. मृत्यू १९८७. सासर–सरस्वती श्रीपाद रानडे. रा. नेरुर, ता. मालवण.
२) **चंपू**–जन्म १९३६. मृत्यू १९८८. सासर–चंपा गजानन काळे. वास्तव्य–गिरोबाची वाडी, आरोस, ता. सावंतवाडी.
२०/२ **शिवराम नारायण**–जन्म १८६१. मृत्यू १९२२, संस्कृताध्ययन झालेले साधे, सज्जन गृहस्थ असा नावलौकिक होता. वास्तव्य–रेडी, कनयाळे येथे.
भार्या : नाव माहीत नाही. माहेर–गाडगीळ. रा. आरोस, ता. सावंतवाडी.
२१/३ **दत्तात्रय शिवराम**–जन्म १५ ।४ ।१८९५. मृत्यू ३० ।१० ।१९५५. व्यवसाय–दुकान व बागायती.
वास्तव्य–मारुती मंदीरासमोर, शिरोडा, ता. वेंगुर्ले.
भार्या : १)**सगुणाबाई**–मृत्यू फाल्गुन शु. ५ इ.स. १९३५.



कै. श्री. दत्तात्रय शिवराम



कै. श्री. शिवराम दत्तात्रय

माहेर—ठकी विनायक बेहेरे, पनवेल. प्रथम भार्येची अपत्ये : कन्या १ पुत्र ३. २) **सगुणाबाई**—जन्म २२ मे १९१९. माहेर—कमल गणेश गोखले. रा. मुसाकाजी. ता. राजापूर, जि. रत्नागिरी. द्वितीय भार्येची अपत्ये : कन्या—२, पुत्र—३.
प्रथम भार्येची कन्या :
**काशी**—जन्म १० ।२ ।१९३२. मृत्यू २० ।११ ।१९८५. सासर—लक्ष्मीबाई विश्वनाथ वझे, आचरे, हिर्लेवाडी, ता. मालवण. द्वितीय भार्येच्या कन्या :
१) **विमल**—सासर—कल्पना भिकाजी केळकर. रा. सातार्डा. ता. सावंतवाडी. मृत्यू १९७८.
२) **उषा**—सासर—सुमाला श्रीपाद सिद्धये. रा. तळकट. ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग. मृत्यू १९७४.
२२/४ **शिवराम दत्तात्रय**—जन्म २० ।२ ।१९२२. मृत्यू २७ ।४ ।१९५५. शिक्षण—मॅट्रिक. दुसऱ्या महायुद्धाचे काळांत (१९४२ ते १९४७) लष्करांत नोकरी. नंतर १९४८ ते १९५५ महाराष्ट्र सरकारच्या सेल्सटॅक्स खात्यात नोकरी. अत्यंत धाडसी व मेहनती स्वभाव. वास्तव्य—जोशीवाडा, खो.नं. ११, सातरहाटी विहिरी समोर, ठाणे.

भार्या : **शैलजा**—जन्म २ ।११ ।१९२७. शिक्षण—बी.ए.बी.एड्. व्यवसाय—शिक्षिकेची नोकरी. १९८५ मध्ये निवृत्त. माहेर—गोदावरी चिंतामण गोखले, मनमाड, जि. नाशिक. हल्ली वास्तव्य नाशिक येथे.
कन्या : **मीरा**—जन्म २६ ।११ ।१९४९. शिक्षण—बी.ए. फूड कार्पोरेशन ऑफ इंडिया मध्ये काही काळ नोकरी. सासर—वैशाली शशिकांत देवधर, सरस्वती सोसायटी, दौलतनगर जवळ, ठाणे (पूर्व).
२३/४ **यशवंत दत्तात्रय**—जन्म २ ।७ ।१९२५. मृत्यू १९ ।९ ।१९८९. शिक्षण—मराठी ७ वी (व्ह.फा.) पास. व्यवसाय—नोकरी व बागायती. शिवाय ज्योतिष. वास्तव्य—शिरोडा, ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग.
भार्या : **अन्नपूर्णा**—जन्म १० ।२ ।१९३२. शिक्षण—मराठी ७ वी पर्यंत. माहेर—गोदावरी केशव जोशी, पेडणे (गोवा).
कन्या :**लता**—जन्म १० ।२ ।१९६२. सासर—लीना लीलाधर जोशी, मधली आळी, रत्नागिरी.
२४/४ **जनार्दन दत्तात्रय**—जन्म ७ ।१ ।१९२९. शिक्षण—बी.ए. (ऑनर्स) मुंबई विद्यापीठ. व्यवसाय—केंद्रसरकारच्या ऑडिट डिपार्टमेंटमध्ये ए.जी.

ऑफीसमध्ये नोकरी. ऑडिट ऑफिसर म्हणून जानेवारी १९८७ मध्ये निवृत्त. सामाजिक व शैक्षणिक कार्याची खूप आवड. १९७५ पासून ठाणे येथील ब्राह्मण शिक्षण मंडळामध्ये सह-चिटणीस, चिटणीस, खजिनदार व सध्या कार्याध्यक्ष या पदांवर सक्रीय सहभाग. नोकरीनिमित्त भारतात भरपूर भ्रमण. शिवाय एअर इंडियाचे ऑडिटसाठी १९७७ मध्ये दीड महिना परदेशी वास्तव्य (जिनेव्हा, लंडन, न्यूयार्क इ. ठिकाणी). फिरतीचे नोकरीमुळे भरपूर अनुभव. वास्तव्य—जोशीवाडा, खो. नं. ११ सातरहाटी विहिरीसमोर, लोकमान्य आळी, ठाणे. अभ्यंकर कुल-वृत्तांतासाठी धडपड व कार्य. कष्टाळू व मनमोकळा स्वभाव.

भार्या : **प्रतिभा**—जन्म १६ ।५ ।१९३५. शिक्षण—मॅट्रिक. माहेर—काशी विनायक केळकर, गुजर आळी, राजापूर. जि. रत्नागिरी.गृहिणी

कन्या :

१) **कल्पना**—जन्म २२ ।६ ।१९५८. शिक्षण—बी. एस्सी., सी.ए., आय. आय.बी. व्यवसाय—बँक ऑफ बडोदामध्ये अधिकारी. सासर—कल्पना चंद्रशेखर देवधर. बुधवार पेठ, पुणे. सध्याचे वास्तव्य—१० सुलभा अपार्टमेंट, धोबी आळी, ठाणे-१.

२) **नीलिमा**—जन्म २३ ।२ ।१९६०. शिक्षण—मॅट्रिक, जी.डी.आर्ट. टेक्सटाईल डिझायनर. सासर—सुजाता शशांक गद्रे. १४३३ब, शुक्रवार पेठ, पुणे-२.

२५/५ **देवदत्त (मिलिंद) जनार्दन**—जन्म १० ।३ ।१९६३. शिक्षण—बी.कॉम. व्यवसाय—एअर इंडिया, सांताक्रुझ येथे नोकरी.

द्वितीय भार्येचे पुत्र

२६/४ **विजय दत्तात्रय**—जन्म २० ।१० ।१९५२. शिक्षण—एस्.एस्.सी. व्यवसाय—न्यू इंडिया इन्शुरन्स कं. त स्टेनोग्राफर म्हणून नोकरी. वास्तव्य—ओम् जगदीश सोसायटी ब्लॉक नं. ६ देवीदास लेन, बोरिवली (प.) मुंबई.

भार्या : **माधुरी**—माहेर—माधुरी कृष्णाजी जोशी. चवदार तळ्याजवळ, महाड. जि. रायगड.

२७/५ **विक्रांत विजय**—१९ ।९ ।१९७७. शिकत आहे.

२८/५ **चैतन्य विजय**—१२ ।१२ ।१९८०. शिकत आहे.

२९/४ **जगन्नाथ (मनोहर) दत्तात्रय**—जन्म ३१ ।८ ।१९५३. वास्तव्य—शिरोडा.

भार्या : **जयश्री**—माहेर—उषा विनायक बेहेरे, वास्तव्य—बेळगांव. अपत्य नाही.

३०/४ **गिरीश (बंडू) दत्तात्रय**—जन्म ३ ।८ ।१९५५. शिक्षण—एस्.एस्.सी. वास्तव्य—शिरोडा.

भार्या : **गीता**—माहेर—विमल व्यंकटरमण भट्ट, अरबैलघाट, ता. येल्लापूर. जि. कारवार.

कन्या :**माया**—जन्म २० ।१० ।१९८४. शिकत आहे.

३१/५ **श्रीराम गिरीश**—जन्म २५ ।५ ।१९८३. विद्यार्थी.